	सार्वजनिक आरोग्य सेवा
	जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र,रत्नागिरी
	जिल्हा रुग्णालय रत्नागिरी कंपाउंड,ता.जि. रत्नागिरी
	कार्यालय दूरध्वनी केंद्र :- (०२३५२) २२२८४०
	इमेल आयडी :- dtomhrtg@rntcp.org
आरोग्य सेवा	जा.क्र.जिक्षके/डिस्पेनशन/2494 /२६ दिनांक :०३/११/२०२६

दरपत्रक सुचना

विषय - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा क्षयरोग केंद्र रत्नागिरी करिता प्रयोगशाळांकरिता आवश्यक साहित्य साधने व रसायने या बाबींची खरेदी करणेबाबत..

जिल्हा क्षयरोग केंद्र , रत्नागिरी येथील सन २०२६-२७ करीता मंजूर अनुदानाच्या अधिन राहून प्रयोगशाळांकरिता आवश्यक साहित्य साधने व रसायने खरेदी करावयाची आहे . त्याकरीता खालील दरपत्रक मागविण्यात येत आहे . तरी खालील प्रमाणे आपण साहित्य साधने पुरविण्यासाठी इच्छुक असाल तर आपले बाजार भावाचे (सर्व करा सहित) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक १२/११/२०२६ रोजी सायं. ०४. ०० वाजे पर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे .

*** लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) शॉप ॲक्ट लायसन्स झेरॉक्स प्रत.

२) व्यवसायाच्या व्याप्ती नुसार जीएसटी क्रमांक आवश्यक जर जीएसटी क्रमांक नसल्यास तसे प्रमाणित केलेले मूळ प्रमाणपत्र आवश्यक.

३) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत,

४) अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug License) जोडणे आवश्यक

५) पूर्वानुभव दाखला (एक्सपिरीयंन्स सर्टिफिकेट) जोडणे आवश्यक

*** लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) लिफाफा दोन मध्ये सिल बंद दरपत्रक सादर करावे .

सदरचे तांत्रिक व आर्थिक लखोटा स्वतंत्र लखोट्या मध्ये सिल बंद करून जिल्हा क्षयरोग अधिकारी रत्नागिरी यांचे नावे कार्यालयीन वेळेत हे दरपत्रक प्रसिध्द झाले पासून अंतिम तारखे पर्यंत कार्यालयात पोहोच होतील असे पाठविण्यात यावेत .

प्राप्त दरपत्रके हि दिनांक १३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हा क्षयरोग अधिकारी रत्नागिरी यांच्या दालनात उघडण्यात येतील . अटी व शर्ती तसेच दरपत्रके मंजुर वा ना मंजुर करणेचा अधिकार जिल्हा क्षयरोग अधिकारी , रत्नागिरी यांनी आपल्याकडे राखून ठेवणेत आला आहे . सदरची दरपत्रके ज्यांच्या नावे मंजुर केले जाईल त्यांना मंजुर दरा प्रमाणे पुरविणे बाबतचे आदेश देण्यात येतील . आदेश प्राप्त झाले पासून पुढील एक वर्षासाठी मंजूर दराप्रमाणे पुरविणे बंधनकारक राहणार आहे.

*** अटी व शर्ती पुढील प्रमाणे -**

1	सदर दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर जिल्हा क्षयरोग केंद्र दरपत्रक असे नमुद करावे.
2	दरपत्रकासोबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licencs) जोडणे आवश्यक.
3	दरपत्रकांचे दर नमूद करताना औषधांचे पॅकिंग साईज व उत्पादित कंपनीचे नाव नमूद करणे आवश्यक आहे.
4	यादीमधील बाबी या कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे खरेदी केली जातील.
5	अत्यावश्यक वेळी २४ तासात पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच ठरवून दिलेल्या

Scanned with OKEN Scanner

	कालावधीत साहीत्याचा पुरवठा न झाल्यास नियमानुसार दंडात्मक रक्कम पुरवठादाराच्या देयकातून रक्कमेतून वसूल केली जाईल.
6	सदर दर पत्रकातील बाबींचा पुरवठा हा हॉस्पिटल मधील औषध भांडारापर्यंत आणून पोहोच करावयाचा आहे.
7	दरपत्रक मंजूर झाल्यानंतर पुरवठा केलेल्या औषधांच्या बिलामध्ये आपला Drug License no, पॅन कार्ड व जी.एस.टी. नं लिहावा. तसेच आयकर, व्यवसायकर इ. तसेच नियमानुसार जे शासकीय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.
8	मंजूर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा करणे आपणास शक्य झाले नाही व त्यामुळे वाढीव दराने बाहेरुन खरेदी करावी लागली तर दरपत्रकामधील मंजूर दर व वाढीव दर या मधील फरकाची रक्कम आपल्याकडून वसूल करण्यात येईल.
9	सोबत जोडलेल्या यादीतील आपण पुरवू शकणा-या औषधांचे दर देणे बंधनकारक आहे. तसेच दर MRP / DPCo जास्त असू नये तसेच साहित्यांचा दरांबाबत राज्य शासन/केंद्रशासनाचे सर्व शासन निर्णय व परिपत्रकांचे पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.
10	प्रयोगशाळांकरिता आवश्यक साहित्य साधने व रसायने हे नामांकित कंपनीची असावीत.
11	एखादे साधनसामुग्री अप्रमाणित अथवा खराब आढळल्यास त्याविषयी होणाऱ्या सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. नवीन बदली करून द्यावे लागल्यास तो पुरवठा विनाशर्त व इतर खर्चाशिवाय पुरविणे हे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील.
12	यादीमध्ये नमूद करण्यात आलेली प्रयोगशाळांकरिता आवश्यक साहित्य साधने व रसायने हे मागणीनुसार त्वरीत पुरवठा करण्यात यावीत. २ वर्षापेक्षा कमी प्रभावशून्यतेची (Expiry Date) साहित्य पुरवठा करु नयेत. स्वीकारली जार नाहीत.
13	शासन निर्णयानुसार खरेदी करण्यात आलेल्या औषधांचा वापर हा NABL Acredted Lab कडुन गुणवत्ता तपासणी करूनच रुग्णांना वितरीत करावयाची असल्यामुळे सदर तपासणीकरिता आवश्यक असणारा खर्च पुरवठादार यांचे कडुन च करावा लागेल.
14	निश्चित केलेल्या दराप्रमाणेच देयके तीन प्रतित ए:४ साईज मध्ये सादर करावीत.
15	पुरवठा केलेल्या साहित्य साधने व रसायने देयके अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा केली जातील . प्रयोगशाळांकरिता आवश्यक साहित्य साधने व रसायने ची / दरपत्रके Authorised Distributers यांनी सोबत त्याबाबतचे कंपनीचे पत्र सादर करावे . सदर साधनसामुग्री हे अत्यावश्यक सेवेसाठी लागणारी असून जिल्हा क्षयरोग केंद्र रत्नागिरी यांनी मागणी करताच तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
16	दरपत्रकासोबत जोडण्यांत येणारी सर्व कागदपत्रे साक्षांकित करुन सादर करावीत. तसेच आवश्यकता असल्यास मुळ कागदपत्रे सादर करणे बंधन कारक आहे.

(डॉ.एम.डि. गावडे)
जिल्हा क्षयरोग अधिकारी,
रत्नागिरी

कार्यालयाचा पत्ता
मा. जिल्हा क्षयरोग अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय, रत्नागिरी

Scanned with OKEN Scanner

*** खरेदी करावयाच्या प्रयोगशाळा साहित्य,साधनसामुग्री व रसायने ची यादी -**

Sr.No.	Particularss	Specification	Unit	Required Quantity
1	Tharmacol Box (EPS21) sample Transportaion	210mmX165mmX150mm-ID)	1 box	200
2	Falcon Tube(50ml)	Centrifugal Tube	1 Tube	10000
3	Ethanol (AR 99.9%)	Absolute Alcohol-99.8% (Used for LED-FM stain preparation	500ml Bott	10
4	Liquid Paraffin	heavy grade (for ZN stain)	500 ml Bott	5
5	Methanol (500ml bott.)(99%)	Absolute Alcohol-99.8% (Used for ZN stain preparation)	500 ml Bott	20
6	Tissue paper (Roll)	Deoiling of slides	1 Roll	100
7	Distilled water (5 lits Can)	For Preparation of Satin	5 Lts cans	20
8	Spirit (650 ml Denatured) for spirit lamp	For Spirit Lamp	550 ml bott.	50
9	Sample Conatiner	For Sputum Collection		50000
10	Broom Sticks	Pack of 500 Nos	1*500	25
11	Whitman's Filter paper NO.1	Pack of 100 for lab	100	30

(डॉ.एम.डि. गावडे)
जिल्हा क्षयरोग अधिकारी,
रत्नागिरी

Scanned with OKEN Scanner